# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 April 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या प्रचाराला वेग, स्टार प्रचारकांच्या ठिकठिकाणी जाहीर सभा
- छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार
- मतदान केलेल्या नागरिकांना दोन दिवस तपासणी शुल्कात सूट देण्याचा इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या परभणी शाखेचा निर्णय

आणि

- धाराशिव जिल्ह्यातल्या शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद केलेल्या २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या प्रचाराला वेग आला आहे. मोठ्या राजकीय पक्षांच्या स्टार प्रचारकांच्या जाहीर सभा ठिकठिकाणी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी उत्तरप्रदेशातल्या सहारनपूर इथं, तर दुपारी राजस्थान मधील अजमेर तालुक्यात पुष्कर इथं सभा घेतली. त्यानंतर उत्तरप्रदेशात गाझियाबाद इथं पंतप्रधान रोड शो मध्ये सहभागी झाले होते.

भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी यवतमाळ जिल्ह्यात पांढरकवडा इथं प्रचार सभा घेतली.

काँग्रेस पक्षाच्या वतीने आज राजस्थानात जयपूर इथं पक्षाच्या जाहीरनाम्याच्या अनुषंगानं मोठी प्रचार सभा घेण्यात आली. त्यामध्ये पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी सहभागी झाले होते.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत परवा आठ तारखेपर्यंत आहे. तर तिसऱ्या टप्प्यांची अधिसूचना येत्या १२ तारखेला जारी होणार आहे.

****

काँग्रेस पक्षानं आज आणखी सहा उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यात गोवा राज्यातल्या उत्तर गोवा मतदारसंघासाठी रमाकांत खलप, दक्षिण गोवा मतदार संघासाठी कॅप्टन विरीयटो फर्नांडिस यांना, मध्य प्रदेशातल्या मोरेना मतदार संघासाठी सत्यपालसिंग सिकरवार, ग्वाल्हेरसाठी प्रवीण पाठक, तर खंडवा लोकसभेसाठी नरेंद्र पटेल यांना उमेदवारी दिली आहे. दादरा आणि नगर हवेली इथल्या एका जागेसाठी अजीत रामजीभाई महला यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने महायुतीचं काम न करता तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे. अहमदनगर इथं आज झालेल्या निर्धार मेळाव्यात हा निर्णय घेण्यात आला. पक्षाचे संपर्क प्रमुख श्रीकांत भालेराव आणि राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्धार मेळावा घेण्यात आला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने लोकसभेच्या निवडणुकीसाठी महायुतीकडून शिर्डी आणि सोलापूरच्या जागेची मागणी केली होती, ती मान्य होत नसल्या कारणाने पक्ष तटस्थ राहणार असल्याचं याबाबच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

शिवसेना शिंदे गटाचे कल्याणचे विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील. महायुतीतील भारतीय जनता पक्षासह सर्व घटक पक्ष त्यांना मताधिक्याने निवडून आणतील, असं भाजपचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केलं. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. भारतीय जनता पक्ष हा देशातला सर्वाधिक सदस्य असलेला, त्याचप्रमाणे सर्वात जास्त लोकप्रतिनिधी असणारा पक्ष आहे. या पक्षात कधीच फूट पडली नाही, कारण या पक्षाचे कार्यकर्ते आत्मकेंद्रित नाहीत, असं त्यांनी सांगितलं. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर नेते आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

****

दरम्यान, भाजपच्या ४४व्या स्थापना दिनानिमित्त भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. गेली अनेक वर्ष कठोर परिश्रम, संघर्ष आणि त्यागातून पक्षाची उभारणी केलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानत असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अविभाज्य घटक असल्याबद्दल भाजपला अभिमान वाटत असून ही भागीदारी आणखी दृढ व्हावी, असं ही त्यांनी म्हटलं आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह आणि अध्यक्ष जे पी नड्डा यांनीही सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त मुंबईच्या दादर इथल्या वसंत स्मृतीच्या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आला. तसंच मुंबईत भाजप कार्यालयात अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी ध्वजारोहण केलं.

****

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा `लोकनिर्णय महाराष्ट्राचा` हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण अकोला लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

तेलंगणाच्या सीमेला लागून असलेल्या छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातल्या जंगलात आज सकाळी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. तेलंगणात मुलुगी जिल्ह्यातल्या आंतरराज्य सीमेजवळच्या पुजारी कांकेर जंगलात ही चकमक झाली. पोलिसांनी नक्षलवाद्यांकडून एक एके ४७, एक एलएमजी आणि एक १२-बोअर बंदूक, आदी साहित्य जप्त केलं.

****

आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या कोठडीत १८ एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यांना आज दिल्लीतल्या राऊज ॲव्हेन्यू न्यायालयात हजर करण्यात आलं. दिल्ली उत्पादनशुल्क धोरण घोटाळ्याप्रकरणी विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी सिसोदिया यांच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्याचे आदेश दिले.

****

परभणी जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी इंडीयन मेडिकल असोसिएशनच्या परभणी शाखेच्या वतीने मतदान केलेल्या नागरिकांना दोन दिवस तपासणी शुल्कात ३० टक्के सूट देण्यात येणार आहे. डॉक्टर संघाने जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांची भेट घेऊन याबाबतचं पत्र दिल्याची माहिती, जिल्हाध्यक्ष डॉ राजगोपाल कालानी यांनी दिली.

दरम्यान, जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावं, आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सामाजिक संघटना आणि संस्थांनी पुढाकार घेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी गावडे यांनी केलं आहे.

***स्वीपच्या अंतर्गत आपण वेगवगळ्या संस्था, संघटना, सामाजिक संस्था यांना बोलवून आवाहन केलं होतं की, २६ तारखेला मतदाना टक्का वाढवण्यासाठी आपणही आपल्या ज्या दैनंदिन सेवा आहेत, त्यामध्ये काहीतरी सूट जाहीर करावी. तात्काळ इंडियन मेडिकल असोसिएशनने त्याला चांगला प्रतिसाद दिला. आणि त्या माध्यमातून त्यांनी असं एक निवेदन आमच्याकडे दिलं की, दिनांक २६ व २७ एप्रिल रोजी जे कोणी नागरिक मतदान केल्याची बोटाची शाई दाखवून आमच्याकडे उपचारासाठी येतील त्यांना तपासणी शुल्कमध्ये ३० टक्के अशी भरघोस सूट देणार आहेत. आणि अजून काही संघटनांनी पुढं येऊन नागरिकांसाठी मतदानासाठी सूट द्यावी, असं मी त्यांना जाहीर आवाहन करतो. धन्यवाद.***

****

धाराशिव जिल्ह्यातल्या सुमारे दोन हजार ९९४ पूर्णांक ५४ हेक्टर शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद करत, ऑनलाईन सेवा केंद्र चालकांनी शासनाची आणि विमा कंपन्यांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात बीड जिल्ह्यातले १६, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले दोन, परभणी दोन, नांदेड एक, तसंच सोलापूर एक आणि धाराशिव जिल्ह्यातल्या एका सेवा केंद्राचा समावेश आहे. शासकीय जमिनीचे कोणतेही भाडेकरार किंवा संमतीपत्र नसतांना सुमारे एक हजार

एकशे सत्तर शेतकऱ्यांच्या नावावर खोट्या नोंदी दाखवत हा पीक विमा या केंद्र चालकांनी भरला होता, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मुलामुलींना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणल्यास समृद्ध राष्ट्र निर्माण होईल, असं बीड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी यांनी म्हटलं आहे. बालविवाह जनजागृती अभियान, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि विवेकानंद विद्यामंदिर, यांच्या संयुक्त विद्यमाने आज घेण्यात आलेल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते.

****

मुस्लिम धर्मीयांसाठी पवित्र असलेल्या रमजाम महिन्यातील शब-ए-कद्र आज साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्तानं सर्व मशिदींमध्ये आज रात्रभर नमाज अदा केली जाते. छत्रपती संभाजीनगर शहरातल्या प्रसिद्ध जामा मशिदीत विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलेलं आहे, तसंच इतर मशिदींमध्येही प्रार्थना केली जाणार आहे.

****

नांदेड इथल्या कवयित्री मीनाक्षी आचमे-चित्तरवाड यांच्या 'इटुकली पिटुकली' बाल कवितासंग्रहाला अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाचे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत. शिशुसाहित्य या विभागात उत्कृष्ट प्रकाशनासाठीचा प्रथम पुरस्कार, तर उत्कृष्ट मुखपृष्ठ विभागात याच संग्रहाचे मुखपृष्ठ तयार करणारे चित्रकार संतोष घोंगडे यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. येत्या २८ एप्रिल रोजी पुणे इथं या पुरस्कारांचं वितरण होणार असल्याची माहिती, इसाप प्रकाशनाचे दत्ता डांगे यांनी दिली.

****

बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या परिसरात आज स्वछता मोहीम राबवण्यात आली. रुग्णालयाच्या सर्व डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी आणि विद्यार्थांनी या मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे, डॉ. लक्ष्मण तांदळे उपस्थित होते.

****

भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या हॉकी संघादरम्यानच्या पाच सामन्यांच्या मालिकेतल्या आज झालेल्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा पाच – एक असा पराभव केला. मालिकेतला दुसरा सामना उद्या होणार आहे.

****

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथं राजस्थान रॉयल्स आणि रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना होणार आहे. सायंकाळी साडे सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

****